# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र.१, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५.
**दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४/६५/६९ फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६**
**ई-मेल** : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
**संकेत-स्थळ** : www.mercindia.org.in/www.merc.gov.in

जाहिरात क्र. २३/२०१९-२०

## जाहीर सूचना

**सन २०१९ चे प्रकरण क्र. ५२**

**आर्थिक वर्ष २०१९-२० साठी नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानाकरिता सामान्य (जेनेरिक) वीज दराच्या प्रारुप आदेशावर अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागविण्याबाबत.**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने सन २०१८ च्या प्रकरण क्र.२०४ मध्ये दि.१८ ऑगस्ट, २०१८ रोजी १ ऑगस्ट, २०१८ ते ३१ मार्च, २०१९ या कालावधीसाठी सामान्य वीज दराच्या आदेश निर्गमित केला आहे.

२. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी आणि शर्ती) विनियम, २०१५ च्या विनियम ९ च्या अनुरोधाने, आर्थिक वर्ष २०१९-२० करिता (सन २०१९ चे प्रकरण क्र.५२) महाराष्ट्रातील नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानाकरिता सामान्य (जेनेरिक) वीज दराच्या निश्चितीकरणाबाबत आयोगाने स्वतः प्रारुप आदेश तयार केला असून, सदर प्रारुप आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in/www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

३. या प्रारुप आदेशावर, आयोग लेखी अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागवित असून त्या, ६(१+५) प्रतींमध्ये, आयोगाचे सचिव यांना, मविनिआ, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५, येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने, किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्स:०२२-२२१६३९७६, ई-मेल : mercindia@merc.gov.in) द्वारा दि. २२ मार्च, २०१९ पर्यंत कृपया पाठविण्यात याव्यात.

४. या अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकतींवर पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेलचा पत्ता, असल्यास, देण्यात यावा. जर कोणत्याही संस्था किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने हरकती पाठविण्यात येत असतील तर तसे नमूद करण्यात यावे. पाठविणाऱ्या व्यक्तिला आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असेल तर तसे देखील त्यामध्ये नमूद करावे, म्हणजे अशा प्रकरणी सदर व्यक्तिला, **१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५ येथील आयोगाच्या कार्यालयात सोमवार, दिनांक २५ मार्च, २०१९, सकाळी १०.०० वाजता** होणाऱ्या जाहीर सुनावणीमध्ये, त्याचे म्हणणे मांडण्याची संधी आयोगाकडून देण्यात येईल, त्यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

५. **दिनांक २२ मार्च, २०१९** रोजी किंवा त्यापुर्वी प्राप्त होणारे सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती आयोगाकडून प्रारुप आदेशास अंतिम स्वरुप देण्यापुर्वी विचारात घेण्यात येतील.

**दिनांक : ०१ मार्च, २०१९** — **सचिव,**
**ठिकाण : मुंबई** — **महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**Size 8 X 18**